ARTHA · Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3484. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख २० मार्च, १९५७ | अंक १२

## विविध माहिती

**रशिअन गिर्यारोहकांचा यत्न**—रशिआ हिमालयाचें अत्युच्च शिखर गौरीशंकर पादाक्रांत करण्यासाठी आपली एक तुकडी पाठविणार असल्याचें कळतें. रशिआंतील पर्वतांचीं शिखरें चढण्याचा सराव असणारे कुशल गिर्यारोहक ह्या तुकडींत समाविष्ट करण्यांत येणार आहेत. हिंदी गिर्यारोहक तेनसिंग ह्यांच्याकडून रशिअन तज्ज्ञ जरूर ती माहिती करून घेणार आहेत.

**जपानकडून मिळालेली देणगी**—भारताला यावयाच्या तांत्रिक साह्याच्या कार्यक्रमाला अनुसरून अमेरिकेनें वाफेवर चालणाऱ्या रस्ते करणाऱ्या ८ रुळांची देणगी दिली आहे. हीं एंजिनें जपानी बनावटीचीं असून त्यांच्या वहातुकीचा सर्वहि खर्च अमेरिकेनेंच केला. सर्व रूळ घेऊन एक अमेरिकन बोट नुकतीच मुंबई बंदरांत आली.

**सुएझ कालव्यांतील अडथळा**—सुएझ कालव्यांत बुडविण्यांत आलेल्या १०,००० टन वजनाच्या बोटीचा अडथळा काढून टाकण्याच्या कामास प्रारंभ झाला आहे. ह्या बोटींत स्फोटक द्रव्यें असल्यामुळें तीं काढून टाकल्याशिवाय संयुक्त राष्ट्राच्या तंत्रज्ञांना बोटीला हात लावतां येत नव्हता. आतां इजिप्तच्या सल्लागारांनीं स्फोटकें काढण्यास प्रारंभ केला आहे.

**युनिअन जॅक निशाणाला अर्धचंद्र**—दक्षिण आफ्रिकेच्या कायदेमंडळानें सार्वजनिक इमारतींवर ब्रिटनचें युनिअन जॅक निशाण लावण्यास बंदी करणारें बिल मंजूर केलें आहे. ह्या निशाणाची छोटी आकृति आफ्रिकेच्या सध्यांच्या निशाणांत आहे, ती तरी कायम ठेवण्याची मागणी विरोधी पक्षानें केली होती पण तीहि नामंजूर झाली.

**नेहरूंना नवें विमान**—गेल्या महिन्यांत रशिआनें दिलेल्या 'इल्यूशिन' विमानाला अपघात होऊन पंतप्रधान नेहरू ह्यांना रायचूर येथें अचानकपणें उतरावें लागले होतें. ह्या विमानाच्या बदली तसलेंच नवें विमान रशिआनें देऊं केलें असून पं. नेहरू ह्यांनीं त्याचा स्वीकार केला आहे. पहिल्या विमानाच्या अपघाताच्या चौकशींत भाग घेण्यासाठीं रशिअन तज्ज्ञ येत आहेत.

**शारीरिक शिक्षण संस्थांना मदत**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत शारीरिक शिक्षणासाठी मध्यवर्ती सरकारनें ५० लाख रुपयांची तरतूद केलेली आहे. ह्या रकमेपैकीं ३३ टक्के रकम शारीरिक शिक्षणक्षेत्रांत कार्य करणाऱ्या संस्थांना मदत म्हणून देण्यांत यावी अशी सूचना मध्यवर्ती शारीरिक शिक्षण बोर्डानें केली आहे.

**पाकिस्तानला विजेचा पुरवठा बंद**—पंजाबमधील कांग्रा डोंगरांत बांधलेल्या जोगिंदरनगर येथील वीज निर्मिति केंद्राकडून पश्चिम पाकिस्तानला विजेचा पुरवठा करण्यांत येत असतो. खुद्द पंजाबमध्यें विजेला अधिक मागणी येऊं लागल्यामुळें हा पुरवठा १ नोव्हेंबर १९५७ पासून बंद करण्यांत येणार आहे.

**सत्वांश काढलेली दूध भुकटी**—अमेरिकेच्या शेतकी खात्यानें सत्वांश काढलेली आणखी दुधाची भुकटी विकत घेण्यास भारताला परवानगी दिली आहे. ह्या भुकटीची किंमत ६,५८,००० डॉलर्स इतकी होईल. ही किंमत रुपयांच्या चलनांत देण्यांत येणार आहे.

**सरकारी नौकरांना किमान पगार**—भारताच्या सरकारनें राज्यसरकारांच्या नोकरांच्या पगाराबद्दल एक योजना मंजूर केली आहे. ह्या योजनेप्रमाणें राज्य सरकारांच्या नौकरांना दुसरी पंचवार्षिक योजना संपण्यापूर्वी किमान ७५ रुपये वेतन मिळण्याची व्यवस्था करण्यांत आली आहे. राज्य सरकारांना ह्या बाबतींत देण्यांत यावयाच्या मदतीचा विचार सध्यां चालू आहे.

**तांत्रिक विषयांचें शिक्षण**—मुंबईपासून २० मैलांवर असलेल्या पवई ह्या ठिकाणीं पश्चिम भारतासाठीं तांत्रिक शिक्षणाची संस्था काढण्याचें ठरलें आहे. ह्या संस्थेंत शिक्षक म्हणून काम करण्यासाठीं संयुक्त राष्ट्रसंघटनेतर्फे १५ प्राध्यापक धाडण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं ६ प्राध्यापक रशिअन असतील.

**नेहरूंच्या दौऱ्याचा चित्रपट**—भारताचे पंतप्रधान श्री. जवाहरलाल नेहरू गेल्या वर्षीं अमेरिकेच्या दौऱ्यावर गेले होते. पं. नेहरूंच्या ह्या दौऱ्याचा अमेरिकेंत तयार करण्यांत आलेला रंगीत चित्रपट मुंबईमधील अमेरिकन माहिती खात्यातर्फे दाखविण्यांत आला. पं. नेहरूंच्या रशिआंतील दौऱ्याचाहि असा चित्रपट त्या देशातर्फे तयार करण्यांत आला होता.

**अमेरिकन मदत मिळणार**—अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मि. डलेस ह्यांनीं कॅनबेरा येथें असें जाहीर केलें कीं, दक्षिण आशिआ संरक्षण कराराच्या बाहेर असणाऱ्या राष्ट्रांनाहि अमेरिकेकडून आर्थिक मदत मिळेल. पण त्यांचा वांटा कमी राहील आणि मदतीची गतीहि मंद राहील.

**काश्मीरमध्यें नवें विमानतळ**—काश्मीरचा जो भाग पाकिस्ताननें व्यापला आहे, त्या भागांत पाकिस्तान सरकार आपल्या विमानांच्या उपयोगासाठीं नवें विमानतळ बांधीत आहे. विमानतळांना अडथळा येत असल्यास रहातीं घरेंहि पाडण्यांत येत आहेत असें समजतें.

## भोर स्टेट बँक लिमिटेड, भोर

### संचालक मंडळाचा तेरावा अहवाल

३१ डिसेंबर, १९५६ अखेरच्या व्यवहारांत बँकेस निव्वळ नफा रुपये ४,३२९–१४–१ झाला आहे. यामध्यें मागील सालचा शिल्लक राहिलेला नफा रुपये १२३–१३–८ मिळवितां एकूण नफा रुपये ४,४५३–११–९ पुढीलप्रमाणें वाटावा अशी संचालक मंडळाची शिफारस आहे.

| | |
|---|---|
| (१) रिझर्व फंडाकरतां तरतूद | रु. ९००– ०–० |
| (२) इन्कमटॅक्सकरितां तरतूद | रु. ४००– ०–० |
| (३) बुडीत व संशयित कर्जाकरितां तरतूद | रु. ३,०००– ०–० |
| (४) पुढील सालीं शिलकी नफा ओढणें | रु. १५३–११–९ |
| एकूण | रुपये ४,४५३–११–९ |

बोर्डानें चालू सालीं भागावर फायदा न वाटण्याचें ठरविलें आहे.

मागिल सालच्या अहवालांत नमूद केल्याप्रमाणें भोर, पाली व शिरवळ येथील सल्लागार मंडळांची, स्थानिक कचेऱ्यांचा कारभार चालविण्याचे कामीं उत्तम प्रकारें मदत मिळत आहे. भोर, पाली व शिरवळ येथील सल्लागार मंडळें तसेंच त्या ठिकाणचे स्थानिक सरकारी अधिकारी, बँकेचा नोकरवर्ग व सर्व खातेदार यांनीं दिलेल्या सहकार्याबद्दल संचालक मंडळ आभारी आहे. संस्थानें विलीन होण्यापूर्वी दिलेल्या कर्जांच्या वसुलीचें कामीं जरी बऱ्याच अडचणी येत असल्या तरी सदर कर्जांच्या वसुलीचे दृष्टीनें जोराचे प्रयत्न करण्यांत येत असून त्यांमध्यें बरेंचसें यशहि येत आहे.

भोर येथील बँकेच्या इमारतीमध्यें जी सेफडिपॉझिट व्हॉल्टची व सेफकस्टडीची व्यवस्था केलेली आहे, त्यांचाहि स्थानिक खातेदार चांगल्या प्रकारें फायदा घेत आहेत. सदर इमारतीमध्यें गोडाऊनचीहि सोय केलेली असून या सोईचाहि फायदा स्थानिक व्यापारीवर्ग घेईल अशी आशा आहे.

गेल्या सालचे रिपोर्टांत नमूद केलेप्रमाणें रावसाहेब य. द. खोले हे जरी बँकेच्या दैनंदिन व्यवहारावर पूर्ववत् लक्ष ठेवून मदत करूं शकलें नसलें, तरी बँकेचे बोर्डावर संचालक म्हणून राहून महत्त्वाच्या बाबतींत पूर्वीप्रमाणेंच बहुमोल मदत करीत आहेत व त्यामुळें त्यांचे अनुभवाचा व सल्ल्याचा बँकेस फायदा मिळत आहे. त्याबद्दल संचालकमंडळ त्यांचे ऋणी आहे.

बँकेची वार्षिक सभा दि. ३० मार्च रोजीं भरणार आहे.

**अंबर चरख्याचा प्रसार**—१९५७–५८ सालांत १,५०,००० अंबर चरखे तयार करून त्यांचा प्रसार करण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. १९५६–५७ सालीं ७५,००० अंबर चरखे तयार करून त्यांचा प्रसार करण्यांत आला. अंबर चरख्यावर तयार झालेल्या कापडाच्या विक्रीला मदत म्हणून ७ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत.

## महाराष्ट्र बँकेचें स्नेहसंमेलन

बँकेच्या स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम खालीलप्रमाणें झाला. त्यावेळीं मुख्य कचेरींतील सुमारें १५० व बाहेरील शाखांचे सुमारें ५० लोक उपस्थित होते.

**दिनांक १६–३–५७ (शनिवार)**

सकाळीं ८ ते १० : रस्सीखेंच, हुतुतू, व्हॉलीबॉल. (स. प. कॉलेज क्रीडांगण)

,, ११ ते ५ : क्रिकेटची मॅच (स. प. कॉलेज)

रात्रौ ९ ते १२ : कवडीचुंबक (प्र. के. अत्रेलिखित)
स्थळ : गोखले हॉल, लक्ष्मी रोड.

**दिनांक १७–३–५७ (रविवार)**

सकाळीं ८ : ग्रुप फोटो (नु. म. विद्यालय)

सकाळीं ८॥ ते ११ "शेजारी" सिनेमा. (वसंत टॉकीज, बुधवार पेठ)

दुपारीं १२ ते ३ : जेवण (बँक बिल्डिंग)

दुपारीं ३॥ ते ५॥ : अन्य मनोरंजक कार्यक्रम.

### 'जनता' विमा पॉलिसी

दि लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लवकरच 'जनता' विमा पॉलिसी सुरू करणार आहे. ह्या प्रत्येक पॉलिसीची किमान रक्कम २५० रु. व कमाल रक्कम १,००० रु. असेल. विमेदाराची वैद्यकीय तपासणी आवश्यक नाहीं. नफ्यासहित व नफ्याविरहित, दोन्ही प्रकारच्या जनता विमा पॉलिसी देण्यांत येतील. एका व्यक्तीला १,००० रु. पेक्षा मोठी 'जनता' पॉलिसी घेतां येणार नाहीं.

**भारताकडून कॉफी पाहिजे**—गेल्या महिन्यांत स्वीडनमधील व्यापाऱ्यांचें एक प्रतिनिधिमंडळ बंगलोरला आलें होतें. मंडळानें भारताकडून कॉफी घेण्याबाबत बोलणीं केलीं. स्वीडन हा देश कॉफी पिणाऱ्या देशांपैकी एक महत्त्वाचा देश आहे. तेथें दरमाणशीं, दरडोई दरसाल १६ पौंड कॉफी खपते. इजिप्तकडूनहि भारताच्या कॉफीविषयीं विचारणा झाली आहे.

**डॅनिश शास्त्रज्ञाचा गौरव**—सुप्रसिद्ध अमेरिकन उद्योगपती मि. हेन्री फोर्ड ह्यांच्या स्मरणार्थ अणुशक्तीचा शांततामय उपयोग करणाऱ्या कार्याबद्दल ७५ हजार डॉलर्सचें बक्षीस ठेवण्यांत आलेलें आहे. हें बक्षीस डॅनिश शास्त्रज्ञ मि. नील्स बॉर ह्यांना देण्यांत आलें आहे. शास्त्रीय कार्याबद्दलच्या बक्षिसांत हें पारितोषक सर्वांत मोठें आहे असें म्हणतात.

**ब्रह्मदेशाला अमेरिकेची मदत**—अमेरिकेकडून आर्थिक मदत घेण्याचें ब्रह्मदेशाच्या सरकारनें मान्य केलें आहे. देशाच्या विकासासाठी अमेरिका ४·२५ कोटी डॉलर्सचें कर्ज देण्यास तयार आहे. त्यापैकी २·५ कोटी रक्कम डॉलर्सच्या चलनांत मिळणार असून बाकीची ब्रह्मदेशाच्या स्थानिक चलनांत मिळणार आहे.

तमाम दंतरोगांवर
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

# अर्थ

बुधवार, ता. २० मार्च, १९५७





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## लोकसंख्येला आळा घालण्याचे चीनमधील प्रयत्न

### कम्युनिस्ट समाज रचनेंतहि लोकसंख्येचा प्रश्न चिंताजनक

भारत व चीन ह्या दोन्ही देशांपुढें असलेल्या सामान्य प्रश्नांत वाढत्या लोकसंख्येच्या योगक्षेमाचा प्रश्न प्रमुख आहे. चीनची लोकसंख्या जगांतील दुसऱ्या कोणत्याहि देशांपेक्षा अधिक आहे. मागील शिरगणतींत चीनमधील लोकसंख्येचा आंकडा ६० कोटी असा देण्यांत आलेला आहे. चीनचा प्रदेश विस्तीर्ण असला तरी पश्चिम चीन हा डोंगराळ व विरळ लोकवस्तीचा आहे. पूर्वेकडील नद्यांच्या खोऱ्यांतूनच अतिशय दाट लोकवस्ती आहे. भारताप्रमाणें चीनच्या सरकारनेंहि देशाच्या विकासासाठी एकामागून एक पंचवार्षिक योजना अंमलांत आणण्यास प्रारंभ केला आहे. परंतु चीनची लोकसंख्या झपाट्यानें वाढत असल्यामुळें बेकारीच्या संख्येंतहि वाढ होत आहे. चीनमध्यें दरसाल सुमारें १·२ कोटी अर्भकांचा जन्म होत असतो असा कम्युनिस्ट पक्षाच्या 'पीपल्स डेली' ह्या वृत्तपत्राचा अंदाज आहे. अर्थातच, वाढत्या लोकसंख्येला आळा कसा घालावा हा प्रश्न महत्त्व पावला आहे.

अगदीं परवांपर्यंत चिनी कम्युनिस्ट सरकारनें असा दृष्टिकोन स्वीकारला होता कीं, भांडवलदारी समाजरचनेंतच लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न चिंताजनक स्वरूप धारण करतो. ह्या बाबतींत चिनी कम्युनिस्टांनीं रशिअन कम्युनिस्ट पक्षाचें मत फारसा विचार न करतां ग्राह्य धरलें. पण आतां ते स्वतःचा अनुभव जमेस धरूं लागले आहेत. रशिआंतील परिस्थिति वेगळी होती. त्या देशांत वसाहती करण्यासाठी लागणारी जमीन मुबलक होती. हवामान मात्र तितकेसें अनकूल नव्हतें. तथापि, आधुनिक शास्त्रीय शोधांचा व रहाणीचा उपयोग करून नव्या वसाहती स्थापन करणें रशिआला शक्य झालें. त्यामुळें लोकसंख्येचा प्रश्न निकराला आला नाहीं. चीनच्या सरकारनेंहि मांच्युरिआ व अंतर्मंगोलिआसारख्या विरळ लोकवस्तीच्या भागांत नव्या वसाहती स्थापन करण्याचें धोरण स्वीकारलें आहे. परंतु ह्या उपायालाहि नैसर्गिक मर्यादा आहेतच. त्या ध्यानांत घेऊन चिनी सरकारच्या आरोग्य खात्यानें ज्या लोकांना संततिनियमनाविषयीं सल्ला हवा असेल त्यांना तो देण्यास १९५२ पासून सुरवात केली. विवाहाचें वय पुढें ढकलून प्रौढपणीं विवाहबद्ध होण्याचा पुरस्कार सरकारतर्फे करण्यांत येऊं लागला. येवढ्यावरच न थांबता आतां पीकिंग येथें संततिनियमनविषयक एक मोठें प्रदर्शन भरविण्यांत आलें आहे. ह्या विषयाकडे लोकांचें लक्ष आकृष्ट करण्यासाठी त्याची योजना करण्यांत आली आहे. औषध विक्रेत्यांच्या दुकानांतून संततिनियमनांचीं साधनें मांडण्यांत आलीं आहेत. वृत्तपत्रेंहि संततिनियमनावर लिहूं लागलीं आहेत.

चीन व भारत ह्यासारख्या देशांत लोकसंख्या अफाट असण्याचें एक कारण असें आहे कीं, ह्या देशांतून स्थिरस्थावर झालेला समाज हजारों वर्षांपासून नांदत आहे. जननाचें प्रमाण फार आहे हेंच त्याचें एकमेव कारण नाहीं. पूर्वी लोकसंख्येला आळा बसण्यासाठी दुष्काळ, रोगराई व युद्ध ह्यांचा उपयोग होत असे. आतां दुष्काळ निवारण, रोगनिवारण इत्यादि बाबतींत खूप प्रगति झालेली आहे. पण अन्नधान्य निर्माण करण्यासाठी लागणारी जमीन कांहीं वाढलेली नाहीं. त्यामुळें लोकसंख्येवर नियंत्रण घालणें जरूर झालेलें आहे. आर्थिक योजनांना घरापासूनच सुरवात करण्यांत आली पाहिजे, आणि राष्ट्रीय योजनेप्रमाणेंच घरागणिक योजनांचा काळजीपूर्वक विचार झाला पाहिजे.

---

## भिलई येथील पोलादाच्या कारखान्याची प्रगति

रशिआच्या मदतीनें मध्यप्रदेशांतील भिलई येथें काढण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्याची प्रगति ठरविल्याप्रमाणें होत आहे. कारखान्यांत दरसाल १० लाख टन पोलाद निर्माण करण्यांत येणार आहे. त्याचा कांहीं भाग १९५८ च्या अखेरीस उत्पादनाच्या कार्यास प्रारंभ करील व संपूर्ण कारखाना १९५९ अखेर निर्मिति करूं लागेल. सोव्हिएट रशिआकडून आलेलें १६,००० टन वजनाचें यांत्रिक साहित्य कारखान्याच्या जागीं पोंचलेलें आहे. कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री व इतर माल पुरविण्याबाबत निरनिराळ्या रशिअन संघटनांशीं करार करण्यांत आले आहेत. त्याचप्रमाणें, कांहीं हिंदी कारखान्यांशींहि विवक्षित काम करण्याचे करार करण्यांत आले आहेत. रशिअन संघटनांकडून अद्याप ६७·५ कोटी रुपये किंमतीची यंत्रसामुग्री यावयाची आहे. भिलईच्या कारखान्याजवळ एक नवें शहरच वसविण्यांत येणार आहे. ह्या शहराचा नकाशा आतां मंजूर झाला आहे. रहाण्याच्या जागेची सोय ही प्रथम करण्यांत येत आहे. सुमारें ९०० घरें बांधण्याचें ठरविण्यांत आलें आहे. त्यापैकी २२५ घरें बांधून झालेलीं आहेत. बाकीच्या घरांचें काम चालू आहे. पुढच्या, म्हणजे १९५७–५८ च्या आर्थिक वर्षात कारखान्याच्या कामासाठी ६३·२ कोटी रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. कारखान्याची मूळची उत्पादनशक्ति १० लाख टनांची असली तरी तिची वाढ करण्याची सोय करण्यांत आली आहे. कारखान्याचा अशा प्रकारें विस्तार करण्यांत आल्यावर त्याची उत्पादनक्षमता १३ लाख टनांपर्यंत वाढवितां येईल. रेल्वेचे रूळ, इमारतींना लागणारें अवजड पोलादी सामान व इतर अनेक प्रकारचें साहित्य कारखान्यांत तयार होऊं शकेल.

---

**पूर्वजर्मनी–इजिप्त व्यापारी करार**—पूर्वजर्मनी व इजिप्त ह्यांच्या दरम्यान एका व्यापारी करारावर सह्या करण्यांत आल्या आहेत. पूर्व जर्मनीकडून इजिप्तला मोटारी, लॉऱ्या, ट्रॅक्टर्स व इतर शेतीचीं अवजारें मिळणार आहेत. ह्या साहित्याची किंमत सुमारें ३०,००,००० डॉलर्स भरेल. लाइपझिग औद्योगिक प्रदर्शनाच्या वेळीं हा सौदा करण्यांत आला.

## उद्योगधंद्यांना औद्योगिक कर्जपुरवठा

उद्योगधंद्यांच्या विशिष्ट गरजा लक्षांत घेऊन त्यांना कर्ज-पुरवठा करण्यासाठीं गेल्या कांहीं वर्षांत कित्येक कॉर्पोरेशन्सची स्थापना करण्यांत आलेली आहे. नवे उद्योग स्थापन होण्यास मदत करणें व चालू उद्योगांची वाढ करणें हा त्यांच्या कर्ज-पुरवठ्याचा उद्देश आहे. व्यापारी बँका कारखानदारांना खेळतें भांडवल पुरवूं शकतात, परंतु दीर्घ मुदतीचीं कर्जें देणें त्यांच्या व्यवहारांत बसत नाहीं. म्हणून, सरकारनें अशा कर्जांसाठी स्वतंत्र संस्था उभारण्याचें ठरविलें, आणि इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची प्रथम स्थापना झाली. मोठ्या उद्योगधंद्यांची अशी सोय पाहिल्यानंतर, मध्यम व लहान उद्योगधंद्यांसाठी राज्यनिहाय स्टेट फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्सच्या स्थापनेसाठी एक कायदा करण्यांत येऊन अशीं कॉर्पोरेशन्स स्थापनहि झालीं. पण त्यांच्या स्थापनेस फार वर्षें झालेलीं नाहींत. नॅशनल इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या स्थापनेचा उद्देश नव्या उद्योगधंद्यांच्या स्थापनेच्या किंवा नव्या उत्पादनाच्या शाखांच्या स्थापनेच्या योजना पार पाडणें हा आहे. कपास आणि ताग ह्यांच्या गिरण्यांची उत्पादनशक्ति वाढ-विण्याकडे ह्या कॉर्पोरेशननें प्रथम लक्ष दिलें आहे. न्यूजप्रिंट, ॲल्युमिनिअम, फौंड्री, इत्यादींच्या वाढीसहि त्यानें हातभार लावला आहे. इंडस्ट्रिअल क्रेडिट अँड इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरे-शनचें वैशिष्ट्य म्हणजे, विदेशी व देशी खाजगी उपक्रमांचें सहकार्य घडवून आणून औद्योगिक पतपुरवठा वाढवणें, हें होय. अमेरिकन आणि ब्रिटिश सहकार्यामुळें, ह्या कॉर्पोरेशनची बैठक मजबूत झाली आहे. खाजगी उपक्रमांना कर्जें देणें, त्यांचे शेअर्स खरेदी करणें, नवे शेअर्स अंडरटाइट करणें, इत्यादि मार्गांनें ही कॉर्पोरेशन उद्योगधंद्यांना मदत करणार आहे. कागद, विजेची यंत्रसामुग्री, रसायनें, टेक्स्टाइल मशिनरी, इत्यादींच्या कारखान्यांना प्रथम मदत मिळणार आहे. इंटरनॅशनल फिनॅन्स कॉर्पोरेशनकडून हिंदी कारखान्यांना मदत मिळेल. भारत ह्या कॉर्पोरेशनचा संस्थापक सभासद आहे 'व्यवस्थापकीय शैली'-चाहि फायदा ह्या संस्थेमार्फत मिळेल. ह्या सर्व संस्थांचें कार्यक्षेत्र अगदीं स्वतंत्र असणें शक्य नाहीं; त्यांच्या सरहद्दी काटेकोरपणें ठरविणें अवघड आहे. औद्योगिक कर्जांसाठी मागणी वाढत असल्यानें, त्यासाठी स्थापन झालेल्या संस्थांचें कार्यक्षेत्रहि वाढत जाणें स्वाभाविक आहे.

### इंडस्ट्रिअल फि. कॉर्पोरेशन

इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया दरसाल सुमारें ५·४ कोटी रुपयांचीं कर्जें मंजूर करीत आलीं असून २·०९ कोटी रुपयांचीं कर्जें प्रत्यक्ष आदा होत आलीं आहेत. त्याचा तपशील खालीं दिला आहे :—

| वर्ष (३० जून अखेर) | मंजूर कर्जें (कोटी रु.) | दिलेलीं कर्जें (कोटी रु.) |
|---|---|---|
| १९४९ | ३·४२ | १·३३ |
| १९५० | ३·७७ | २·०८ |
| १९५१ | २·३९ | २·३८ |
| १९५२ | ४·४५ | १·७८ |
| १९५३ | १·४४ | २·५० |
| १९५४ | ५·२७ | २·८२ |
| १९५५ | ७·३४ | १·६४ |
| १९५६ | १५·१३ | २·२० |
| एकूण | ४३·२१ | १६·७३ |

मंजूर कर्जें व दिलेलीं कर्जें ह्यांतील तफावत चटकन् लक्षांत येण्याजोगी आहे. कॉर्पोरेशननें कर्जदार उद्योगधंद्यांची ११ प्रकारांत विभागणी केली आहे, त्या ११ प्रकारच्या उद्योगधंद्यांना मंजूर केलेल्या कर्जांचा तपशील येथें दिला आहे :—

| उद्योगधंदा | मंजूर कर्ज (कोटी रु.) |
|---|---|
| साखर | ११·५९ |
| कपास टेक्स्टाइल | ६·१८ |
| केमिकल्स | ५·१० |
| कागद | ४·२२ |
| सिमेंट | ३·४० |
| मेकॅनिकल इंजिनिअरिंग | १·६८ |
| इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग | १·५६ |
| सिरॅमिक्स व ग्लासेस | १·५० |
| मोटारी व ट्रॅक्टर्स | १·३४ |
| इतर इंजिनिअरिंग | १·३४ |
| रेयॉन | १·१० |

साखरेच्या कारखान्यांना कर्जपुरवठ्याचे बाबतींत प्राधान्य देण्यांत येत आहे. आठ वर्षांत साखर कारखान्यांना जेवढीं कर्जें मंजूर करण्यांत आलीं, त्यापैकी निम्मीं, म्हणजे ५·५० कोटी रुपयांचीं कर्जें एकट्या १९५५–५६ मध्यें मंजूर केलीं गेलीं. सहकारी साखर कारखान्यांच्या स्थापनेस सरकार मुद्दाम उत्तेजन देत आहे, आणि त्यांना कर्ज मंजूर करण्याचे बाबतींत सहानु-भूतीचें व दिलदारपणाचें धोरण ठेवलें जात आहे.

मुंबई, प. बंगाल, मद्रास, बिहार व त्रावणकोर–कोचीन ह्या राज्यांच्या वांट्याला बहुसंख्य कर्जें आलीं आहेत; तर मध्यप्रदेश, दिल्ली, मध्यभारत आणि आसाम ह्यांच्या वांट्याला कमी कर्जें आलीं आहेत. औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या राज्यांची सोय आधीं पहावयाची, असें आतां धोरण ठेवण्यांत आलें आहे. अर्थात्, त्याला मर्यादा आहे. कारण, अशा राज्यांतून नवे उद्योगधंदे स्थापन करणें हें कांहीं कॉर्पोरेशनचें उद्दिष्ट नाहीं; ते स्थापन होऊन कर्ज देण्यास पात्र झाले, तरच कॉर्पोरेशन त्यांना मदत करूं शकणार, हें उघड आहे. बँकिंगचीं मूलभूत तत्त्वें व सुरक्षितपणा हीं न सोडतां कॉर्पोरेशन विशेष सढळपणा दाखवूच शकणार नाहीं. कॉर्पोरेशनच्या शेअर्सवरील डिव्हिडंडची सरकारनें हमी घेतली आहे व त्या हमीप्रमाणें सरकारनें प्रत्यक्ष रक्कमहि दिली आहे; ह्यापुढें तशी पाळी येणार नाहीं अशी अपेक्षा आहे.

### राज्यनिहाय कॉर्पोरेशन्स

राज्यांची पुनर्घटना होण्यापूर्वी एकूण १३ स्टेट फिनॅन्स कॉर्पोरेशन्सची स्थापना झालेली होती व त्यांचें वसूल भांडवल ११ कोटी रु. होतें. मध्यम व लहान आकाराच्या उद्योगधंद्यांना कर्जपुरवठा करणें, हा ह्या कॉर्पोरेशन्सचा उद्देश आहे; परंतु त्यांपैकीं कित्येक कॉर्पोरेशन्स मोठ्या कारखान्यांनाहि कर्जें देतात, अशी तक्रार ऐकूं येते. लहान कारखान्यांना कर्ज मिळणें अवघड जातें. अशांकडे ह्या कॉर्पोरेशन्सनीं जास्त लक्ष द्यावयास हवें. पण येथेंहि तारणाची, व्यवस्थापकांच्या कारभारविषयक लायकीची, कारखान्यांच्या किफायतशीरपणाची व कर्जाची फेड ठरलेल्या काळांत होण्याच्या शक्यतेची चौकशी करावीच लागते आणि ह्या बाबतींत कॉर्पोरेशन्सचें समाधान करणें लहान कार-खानदारांना अवघड जातें. लहान कारखानदारांच्या लिमिटेड कंपन्या नसल्या, म्हणजे त्यांचे हिशेब चार्टर्ड अकौंटंटकडून बहुधा तपासून घेण्यांत येत नाहींत व त्यांच्या हिशेबांची

पद्धतीहि वेगवेगळी असते. त्यामुळें, कर्ज मागणाऱ्या कारखाऱ्याची पत अजमावणें अवघड जातें.

मध्यभारत वगळून बाकीच्या सर्व स्टेटकॉर्पोरेशन्सनीं १९५५-५६ मध्यें नफा दाखविला आहे. तथापि स्टेट कॉर्पोरेशन्सची हमींचें डिव्हिडंड नफ्यांतून देतां येण्याजोगी परिस्थिति नाहीं; सरकारी मदत त्यासाठी त्यांना घ्यावी लागते. इन्कमटॅक्स व कॉर्पोरेशन टॅक्स त्यांना भरावा लागतो व त्यांनींच नफ्याचा ४३% भाग खाल्ला जातो. पांच वर्षेपर्यंत त्यांना हे कर बावे लागूं नयेत. ही मागणी मध्यवर्ती सरकारनें नामंजूर केली आहे. ही सवलत त्यांना मिळाली, तरीसुद्धां त्यांचे व्यवहार पुरेसे वाढल्यासेरीज त्यांना स्वयंपूर्णता प्राप्त होणार नाहीं. व्यवस्था खर्चात खुपच बचत करण्यांत आली पाहिजे. आंध्र आणि बिहार फिनॅन्शिअल कॉर्पोरेशन्सचा व्यवस्था खर्च ठोक नफ्याच्या अनुक्रमें ६८·१% व ५९·१% झाला. त्रावणकोर-कोचीन फिनॅन्स कॉर्पोरेशनचा सर्वांत कमी, म्हणजे १२·१% इतकाच होता.

## स्टेट फिनॅन्स कॉर्पोरेशन्स

**३१ मार्च, १९५६ अखेरच्या वर्षाबद्दल माहिती : आकडे लक्ष रुपयांचे**

| अ. नं. | कॉर्पोरेशनचें नांव | वसूल भांडवल | स्थापना | कर्जे, डिबेंचर्स | ठोक नफा | व्यवस्था खर्च | व्यवस्था खर्चाचें ठोक नफ्याशीं प्रमाण % | निव्वळ नफा (कराची तरतूद करण्यापूर्वी) | ठोक नफ्याशीं निव्वळ नफ्याचें प्रमाण % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प. बंगाल | १०० | १९५४ | २३·० | ३·४५ | १·०० | २८·९ | २·४५ | ७१·१ |
| २ | पंजाब | १०० | १९५३ | ३९·५० | ४·४८ | १·४१ | ३१·५ | ३·०७ | ६८·५ |
| ३ | सौराष्ट्र | १०० | १९५३ | २७·९८ | ३·८६ | ०·६३ | १६·२ | ३·२३ | ८३·८ |
| ४ | मुंबई | १०० | १९५३ | ६०·४८ | ४·६४ | १·०९ | २३·५ | ३·५५ | ७६·५ |
| ५ | हैद्राबाद | १०० | १९५४ | ३३·३६ | ८·६७ | ०·८१ | २२·० | २·८६ | ७८·० |
| ६ | आसाम | १०० | १९५४ | २६·४२ | ३·६० | ०·८७ | २४·२ | २·७३ | ७५·८ |
| ७ | त्रावणकोर-कोचीन | १०० | १९५३ | ६१·८८ | ४·९४ | ०·६० | १२·१ | ४·३४ | ८७·९ |
| ८ | राजस्थान | १०० | १९५५ | १·८५ | २·७८ | ०·६७ | २४·२ | २·११ | ७५·८ |
| ९ | बिहार | ५० | १९५४ | ३·८५ | १·५३ | ०·९० | ५९·१ | ०·६३ | ४०·९ |
| १० | आंध्र | ५० | १९५५ | ८·०२ | ०·३८ | ०·२६ | ६८·१ | ०·१२ | ३१·९ |


**कण आणि क्षण**

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

लेखक :—श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

**સુખી જીવનની પગદંડી**

( ગૃહજીવનનું માંગલ્ય )

લેખકઃ—શ્રી. વા. કાળે, સંપાદક, "અર્થ"

ગુજરાતી બીજી આવૃત્તિ ] [ કિંમત રૂા. ૧-૮-૦

*** दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड ***

( शिड्यूल्ड बँक )

हेड ऑफिस :—१० बुधवार पेठ, पुणें २ ★ मुंबई शाखा :—८२ मेडोज स्ट्रीट, मुंबई १

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, ( फोन २७६३ ) ★ कॉमनवेल्थ बिल्डिंग, ( फोन ३०४०८ )

अध्यक्ष श्री. ग. रा. साठे

अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००

जमा झालेलें भांडवल ... ... रु. ७,३३,१३५

खेळतें भांडवल ... ... रु. ६२,००,०००

उपाध्यक्ष श्री. वा. ग. बापट

★ चालू खातें व्याज १ टक्का ★ सेव्हिंग्ज खातें व्याज २॥ टक्के ★ मुदत ठेवीवरील आकर्षक व्याजाचे दराबाबत समक्ष भेटा. ★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

—श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए., (ऑ.), बी. कॉम्., एल्एल्. बी. मॅनेजर

## मंत्रिमंडळांत किती मंत्री असावेत ?

'कॅबिनेट' ह्या शब्दाचा अर्थ लहान खाजगी खोली, राज्याच्या मंत्र्यांपैकी प्रमुख मंत्र्यांच्या सभेची खोली, प्रमुख मंत्री ( सर्व मिळून ), असा आहे. कॅबिनेटचे सभासद–मंत्री हे राज्याच्या कारभाराला जबाबदार असतात. हे सर्व मंत्री बहुधा एकाच राजकीय पक्षाचे असतात, आणि त्या पक्षाचें विधिमंडळांत बहुमत असावें लागतें. विधिमंडळाचा पाठिंबा उरला नाहीं, तर कॅबिनेटला म्हणजेच मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागतो. पंतप्रधान हे मंत्र्यांची निवड करतात व मंत्रिमंडळाच्या सभेच्या अध्यक्षस्थानीं बसतात. राज्यकारभाराच्या सर्व प्रमुख प्रश्नांची चर्चा अशा सभेंत होते व त्यांत निर्णय घेतले जातात.

### मंत्री, पण मंत्रिमंडळांत नाहीं

कॅबिनेट पद्धतीचा उगम ग्रेट ब्रिटनमध्यें झालेला आहे. हाउस ऑफ लॉर्ड्स, किंग्ज कौन्सिल, प्रिव्हि कौन्सिल, कॅबिनेट कौन्सिल, अशा अनुक्रमानें कॅबिनेट पद्धतीची उत्क्रांति झाली. कॅबिनेट कौन्सिलमधील प्रमुखांच्या गटास पुढें कॅबिनेट हें नांव मिळालें. मंत्र्यांची एकूण संख्या खूपच मोठी असली, तरी ह्या प्रमुखांच्या गटांत त्यांतील कांहीं निवडक मंत्र्यांचाच समावेश केला जातो. मंत्रिमंडळाच्या बैठकीस बाकीच्या मंत्र्यांना उपस्थित रहातां येत नाहीं. "श्रीयुत 'क्ष' ह्यांना मंत्री नेमण्यांत आलें आहे; परंतु कॅबिनेटचा दर्जा त्यांना देण्यांत आलेला नाहीं" अशा घोषणांचा अर्थ त्यावरून लक्षांत येईल. मंत्रिमंडळामधील मंत्र्यांची संख्या जेवढी लहान, तेवढें श्रेयस्कर, हें उघड आहे. नाहींतर त्या मंडळांत आणखी लहान गट निर्माण होऊन तोच अधिकार गाजवूं लागतो.

### मंत्रिमंडळांतील मंत्र्यांची संख्या

वेगवेगळ्या देशांच्या मंत्रिमंडळांमधील मंत्र्यांची संख्या पुढीलप्रमाणें आहे :—

| मंत्र्यांची संख्या | देश |
|---|---|
| ६ | होंडुरास, लक्झेंबर्ग. |
| ७ | हाइटी, आइसलंड, स्विट्झरलंड. |
| ९ | कोस्टारिका, इक्वेडॉर, उत्तर आयर्लंड, सैबेरिया, पनामा, फिलिपाइन्स, युराग्वे. |
| १० | ग्वाटेमाला, एल साल्वेडार, युनायटेड स्टेट्स. |
| ११ | ब्राझील, निकाराग्वा, पाकिस्तान, पाराग्वे. |
| १२ | बोलिव्हिया, चिली, पेरू. |
| १३ | कोलंबिया, डोमिनियन रिपब्लिक, नॉर्वे, थाइलंड. |
| १४ | डेन्मार्क, भारत, द. आफ्रिका, स्वीडन. |
| १५ | ऑस्ट्रिया, बेल्जिअम, फिनलंड, इराण, न्यूझीलंड, पोर्तुगाल, वेनेझुएला. |
| १६ | इराक, नेदरलंडस्, तुर्कस्तान. |
| १७ | आयर्लंड, इस्राएल, स्पेन. |
| १८ | इजिप्त, ग्रेट ब्रिटन, मेक्सिको. |
| १९ | प. जर्मनी, ग्रीस, इंडोनेशिया, इटली. |
| २० | ऑस्ट्रेलिया, फोर्मोसा, जपान. |
| २१ | अर्जेंटिना, बर्मा, कॅनडा, फ्रान्स. |
| २२ | चीन. |
| २४ | पू. जर्मनी. |
| २६ | बल्गेरिया. |
| २७ | क्युबा. |
| २९ | रुमेनिया. |
| ३२ | झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया. |
| ३८ | रशिया. |

सुमारें ६० देशांची सरासरी घेतली, तर ती १६ भरते; परंतु १५ आणि ९ सभासद असलेल्या मंत्रिमंडळांची संख्या प्रत्येकीं सात एवढी आहे. मंत्रिमंडळाच्या सभासदांची संख्या मर्यादित नसेल, तर ते सभासद सभेंत एकमेकांशींच बोलूं लागतात, स्वतःचें म्हणणें मांडण्यासाठी सभासदाला उठून उभें राहण्याची जरूरी भासूं लागते व तो मग भाषण करूं लागतो; महत्त्वाचे मंत्री जेवणासाठी वेगळे एकत्र जमून, निर्णय, घेऊं लागतात ! मंत्रिमंडळाच्या सभासदांचें वय किती आहे, सभा कोणत्या वेळीं भरविली आहे, इत्यादि गोष्टीहि महत्त्वाच्या ठरतात व त्यावर कार्यक्षमता अवलंबून राहते.

### कार्यक्षमतेच्या प्रभावाचें गणित

इन्स्टिटयूट ऑफ कॅमिटॉलॉजी या संस्थेनें ह्या बाबतींत संशोधन करून एक रीति तयार केली आहे, ती "एकॉनॉमिस्ट"नें समजावून सांगितली आहे. इन्स्टिटयूटनें समशीतोष्ण हवामान, आरामशीर खुर्च्या आणि मंत्री शुद्धीवर असण्याचा मोठा संभव, ह्या गोष्टी गृहीत धरलेल्या असणार, हें उघड आहे.

$$\text{क्ष} = \frac{\text{म}^{\text{क}}(\text{अ} - \text{ड})}{\text{य} + \text{प}\sqrt{\text{ब}}}$$

म = सभेस प्रत्यक्ष उपस्थित असलेले सभासद.

क = बाहेरील दडपणास बळी पडणारे सभासद.

अ = सभासदांचें सरासरी वय.

ड = एकमेकांपासून सर्वांत दूर बसलेल्या सभासदांमधील अंतर, सेंटीमीटर्समध्यें.

य = मंत्रिमंडळ बनविण्याला झालेली वर्षें.

प = अध्यक्षाची सहनशीलता ( पीबॉय मोजणीप्रमाणें )

ब = तीन सर्वांत वयस्क सभासदांच्या रक्तदाबाची सरासरी ( रक्तदाब सभेच्या सुरुवातीस तपासणें ).

ह्या फॉर्म्युल्याप्रमाणें, क्ष = ? हें उत्तर किती कमाल सभासद उपस्थित असल्यानें मंत्रिमंडळाचें किंवा इतर कमिटीचें काम कार्यक्षम रीतीनें होऊं शकत नाहीं, ह्याचा आंकडा दर्शवितो आणि तो १९.९ आणि २२.४ ह्यांच्या दरम्यान असतो. कांहीं सभासद् सभेच्या सबंध वेळेंत उपस्थित नसतात, म्हणून पूर्णांक आलेले नाहींत.

### श्री. देशमुखांच्या सूचनेचें रहस्य

कॅमिटॉलॉजीच्या शास्त्रानें अद्याप खूपच प्रगति करावयाची आहे आणि त्याच्या निष्कर्षाकडे ह्याच दृष्टीनें पाहिलें पाहिजे. मंत्रिमंडळामध्यें फारच थोडे सभासद असतील, तर गणपूर्तीला आवश्यक एवढेहि सभासद कधीं कधीं उपस्थित होणार नाहींत आणि मंत्रिमंडळाचा आकार फार वाढला तर त्याचें स्वरूप बदलून अधिकार आंतल्या लहान गटांत एकवटण्याची शक्यता निर्माण होईल. म्हणूनच, मंत्र्यांची संख्या कितीहि वाढविली, तरी मंत्रिमंडळांतील मंत्र्यांची संख्या वाढविली जात नाहीं. आपल्या पक्षांतील असंतोष दूर करण्यासाठी कधीं कधीं कांहींना मंत्रिमंडळांत घेतलें गेलें व त्यामुळें मंत्रिमंडळांत एकोपा उरला नाहीं, तर आंतल्या बातम्या बाहेर फुटतात, गुप्तता रहात नाहीं आणि कधीं कधीं सरकारचा बोज नाहींसा होण्याची पाळी येते. श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनीं आपल्या अर्थमंत्रिपदाचा राजीनामा दिला, तेव्हां त्यांची जागा घेणारा मंत्रि पक्षनिष्ठच असावा म्हणजे तक्रारीचें कारण पडणार नाहीं असें सांगितलें गेलें, त्याचें रहस्य वरील विवेचनावरून स्पष्ट होईल.

## मंत्रिमंडळाच्या सभांचें स्वरूप

मंत्रिमंडळाच्या सभांचें स्वरूप कोणत्या प्रकारचें असतें, हें लक्षांत घेतलें म्हणजे मंत्रिमंडळांतील मंत्र्यांची संख्या बेताची कां असावी व ते सर्व एकदिलाचे कां असावेत, हें आणखी स्पष्ट होईल. सभाशास्त्राचे नियम मंत्रिमंडळाच्या सभांना लागूं पडत नाहींत. तेथें चर्चा केली जाते व त्या चर्चेच्या टिपणांच्या अनुरोधानें खात्यांना सूचना करण्यांत येतात. एकमेकांच्या विश्वासानेंच सर्व कांहीं चालतें व त्यांत परका कोणीच नसतो, त्यामुळें ह्या सभांचें स्वरूपहि अनौपचारिक असतें, आणि कोणतेहि ठराव काटेकोर शब्दांत नमूद केले जात नाहींत. सहाजिकच, मंत्रिमंडळाच्या सभेंत कोणतीहि गोष्ट वज्रलेप अशी ठरत नाहीं; सर्व गोष्टी लवचिकच असतात. तशी वेळ आलीच, तर मुख्य मंत्र्यांचें मतच प्रभावी ठरतें, हें उघड आहे. पति-पत्नींनीं घेतलेल्या निर्णयांची नोंद कुठें असते व त्यांच्या सह्या कुठें घेतलेल्या असतात? तशाच प्रकारचे मंत्रिमंडळाचे 'निर्णय' असतात व पतिपत्नींच्या निर्णयाप्रमाणेंच ते बदलले जातात किंवा त्यांचा अर्थ लावला जातो. मंत्रिमंडळाचे सभासद जबाबदारीच्या भावनेनें वागणारे असतात आणि मुख्य मंत्र्यांचें व्यक्तिमत्त्व श्रेष्ठ प्रतीचें असतें हें गृहीतच धरावयास हवें. अशा मंत्रिमंडळांत मुख्य मंत्र्यांच्या विश्वासाच्या मंत्र्यांसच प्रवेश मिळणार, इतरांना नाहीं, हें उघड आहे. अर्थात् अशा विश्वासू मंत्र्यांकडेच महत्त्वाचीं खातीं दिलेलीं असतात; मग इतर मंत्री व उपमंत्री किती का असेनात!

—श्री. वा. काळे, यांचा 'चित्रमयजगत्' मधील लेख, मार्च, १९५७.


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक : स्थापना १९३५

-भांडवल-

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. | ३२,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | ३२,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | रु. | १०,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ७। कोटींचे वर |

गेल्या वर्षासाठीं बँकेनें ६ टक्के करमाफ डिव्हिडंड जाहीर केले आहे.

संचालक मंडळ

श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष)

श्री. न. ग. पवार (उपाध्यक्ष) श्री. मा. वी. शहा

श्री. धों. कृ. साठे श्री. भा. म. गुत्ते

श्री. मा. रा. जोशी श्री. म. बा. जांभेकर

श्री. फ. दो. पदमजी श्री. म. स. पारखे

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग मॅनेजर


## घाऊक किंमतींचे इंडेक्स नंबर

ऑगस्ट १९३९ अखेरचे वर्ष = १००

| | अन्न | औद्योगिक कच्चा माल | अर्ध-पक्का माल | तयार माल | इतर | सर्व जिनसा मिळून |
|---|---|---|---|---|---|---|
| १९५० सरासरी | ४१० | ५०३ | ३४१ | ३४८ | ६८३ | ४००·७ |
| १९५१ ,, | ४१० | ६०८ | ३७८ | ३९६ | ७३० | ४३९·३ |
| १९५२ ,, | ३६० | ४५४ | ३४७ | ३७८ | ६३६ | ३८६·९ |
| १९५३ ,, | ३८१ | ४६० | ३५६ | ३६७ | ६६२ | ३९३·९ |
| १९५४ ,, | ३५९ | ४४८ | ३५६ | ३७६ | ६४८ | ३८६·८ |
| १९५५ ,, | ३०५ | ४१२ | ३३४ | ३७३ | ५५५ | ३५५·४ |
| १९५६ ,, | ३७३ | ४८८ | ३९० | ३८२ | ५४५ | ४०३·२ |
| १९५६ जाने. | ३३३ | ४५४ | ३५४ | ३७५ | ५१० | ३७६·० |
| फेब्रु. | ३३५ | ४६५ | ३५६ | ३७५ | ५२९ | ३७८·४ |
| मार्च | ३५२ | ४७६ | ३६९ | ३७५ | ५०८ | ३८७·३ |
| एप्रिल | ३६१ | ४७३ | ३७७ | ३७६ | ४९७ | ३९१·२ |
| मे | ३५१ | ४७८ | ३८४ | ३७७ | ५०२ | ३९०·३ |
| जून | ३६६ | ४७९ | ३९२ | ३७८ | ५१९ | ३९७·९ |
| जुलै | ३८१ | ४९२ | ३९५ | ३८६ | ५६० | ४०९·२ |
| ऑगस्ट | ३९७ | ५०१ | ४०६ | ३८८ | ५६५ | ४१८·५ |
| सप्टेंबर | ३९३ | ५०७ | ४०८ | ३९१ | ५६७ | ४१९·८ |
| ऑक्टो. | ३९३ | ५०२ | ४०६ | ३८८ | ५८५ | ४१७·८ |
| नोव्हें. | ४१२ | ५१४ | ४१६ | ३८८ | ५९१ | ४२७·७ |
| डिसें. | ४१४ | ५१८ | ४१८ | ३८७ | ५९० | ४२८·९ |

## शेड्यूल्ड बँकांविषयीं आंकडे

| | डिमांड टाइम देणीं | रोख व बँकांत | | कर्जें | | इन्व्हेस्टमेंटस् | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | कोटी रु. | कोटी रु. | देण्यांशीं प्रमाण % | कोटी रु. | देण्यांशीं प्रमाण % | कोटी रु. | देण्यांशीं प्रमाण % |
| १९५० सरासरी | ८६७ | ९६ | ११·१ | ४४१ | ५०·९ | — | — |
| १९५१ ,, | ८९५ | ९६ | १०·८ | ५३३ | ५९·५ | — | — |
| १९५२ ,, | ८६० | ८६ | १०·० | ५३६ | ६२·३ | ३०४ | ३५·४ |
| १९५३ ,, | ८५३ | ७८ | ९·२ | ५०८ | ५९·५ | ३१८ | ३७·२ |
| १९५४ ,, | ८८७ | ८३ | ९·४ | ५३२ | ६०·१ | ३३३ | ३७·५ |
| १९५५ ,, | ९९४ | ८६ | ८·७ | ५८१ | ५८·५ | ३६५ | ३६·७ |
| १९५६ ,, | १०८१ | ८८ | ८·१ | ७०८ | ६५·५ | ३६४ | ३३·७ |
| १९५६ जानेवारी | १०४९ | ९४ | ८·९ | ६२७ | ५९·७ | ३८२ | ३६·४ |
| फेब्रुवारी | १०४६ | ९० | ८·६ | ६५१ | ६२·२ | ३७८ | ३६·१ |
| मार्च | १०३७ | ८४ | ८·१ | ६९६ | ६७·१ | ३६५ | ३५·२ |
| एप्रिल | १०७३ | ८९ | ८·३ | ७१७ | ६६·८ | ३५७ | ३३·२ |
| मे | १०७१ | ८६ | ८·१ | ७३१ | ६८·२ | ३५४ | ३३·१ |
| जून | १०८४ | ८८ | ८·१ | ७२६ | ६७·१ | ३४९ | ३२·२ |
| जुलै | १०९५ | ८८ | ८·० | ७१७ | ६५·४ | ३४९ | ३१·९ |
| ऑगस्ट | ११०६ | ८७ | ७·९ | ७१२ | ६४·४ | ३६२ | ३२·७ |
| सप्टेंबर | १०९७ | ८७ | ७·९ | ७२३ | ६५·९ | ३७२ | ३३·९ |
| ऑक्टोबर | १०९५ | ८७ | ८·० | ७२३ | ६६·१ | ३७३ | ३४·१ |
| नोव्हेंबर | ११०३ | ८७ | ७·९ | ७३० | ६६·२ | ३६६ | ३३·२ |
| डिसेंबर | ११११ | ८८ | ७·९ | ७४० | ६६·६ | ३६५ | ३२·८ |

# दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी:—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

—शाखा—

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

♣

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,५०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

*—अद्यावत् बँकिंग–व्यवहार केले जातात—*

**श्री. बी. बी. चौधरी,**
बी. ए., एलएल. बी., वकील.
सांगली
चेअरमन

**श्री. देवेंद्र आपया मंगाज**
कोल्हापूर
व्हा. चेअरमन

**एल्. एन्. शहा,**
बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर.

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | | |
| भागीदारांतर्फे | रु. ३५,२३,७०० | |
| मुंबई सरकारतर्फे | रु. २६,००,००० | |
| | | रु. ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | | रु. ६१,८३,९०० |
| ठेवी | | रु. १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | | रु. १३,२५,२४,००० |

## १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

**वा. पुं. वर्दे**
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

स्थापना १९३६

# युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—*पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.*

शाखा–मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३१-३-५६ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | २,२८,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,१२,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष | दोन वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें |
|---|---|---|---|
| रु. २–८–० | रु. २–१२–० | रु. ३–०–० | रु. ३–८–० |

व्हा अगर अधिक वर्षें रु. ४–०–० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १–८–० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ” | २–०–० |
| चालू डिपॉझिट | ” | ०–८–० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

**सी. ह. जोशी,**
बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.

**शं. ह. साठे,**
बी. ए., एलएल. बी., चेअरमन

स्थापना सन १९३५ टे. नं. २६२५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | | |
|---|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. १,००,००० | |
| जमा भांडवल | रु. ९१,००० | |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,००० | हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० | ” |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० | ” |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

| | |
|---|---|
| श्री. भगवंतराव नामदेवराव ढोबळे, | (अध्यक्ष) |
| श्री. गेनुभाऊ गोविंदराव ढोले, | ( उपाध्यक्ष ) |
| श्री. उमाकांत भाऊराव तांबे, | ( ऑ. मॅ. डायरेक्टर ) |
| श्री. मल्हारराव बाबुराव बेंडे, | ( ऑ. ट्रेझरर ) |
| श्री. आनंदराव पांडुजी ढोरे | सभासद |
| श्री. मळीबुवा मार्तंड वामन | ” |
| श्री. गेनुजी लक्ष्मण नलवडे | ” |
| श्री. ज्ञानेश मारुतीराव मनसुख | ” |
| श्री. मनोहर रामजी नेहरकर | ” |

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.